झोपडपट्टी पुनर्वसन प्राधिकरण
५ वा मजला, गृहनिर्माण भवन,
वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१.फॅक्स ९१-२२-२६५९०४५
दुरध्वनी ०२२-२६५ ०५११/०४०५/१८७१/०९९३
Email : info@sra.gov.in

क्र. झोपुप्रा/उजि/कार्या-२/टे/डी-२/परिपत्रक/परि-२प्रसिध्दी/२००९/2713
दिनांक : 18 DEC 2009

**परिपत्रक कमांक :- १०५**

विषय :- परिशिष्ट-२ मधील अपात्र झोपडीधारकांनी अपिलीय प्राधिक-याकडे अपील दाखल करण्याची कालमर्यादा निश्चित करणेबाबत.

महाराष्ट्र झोपडपटटी [सुधारणा निर्मुलण व पुनर्विकास ] अधिनियम १९७१ व विकास नियंत्रण नियमावली ३३[१०] मधील तरतुदीनुसार झोपडपटटी पुनर्वसन योजना राबविण्यात येते. झोपडपटटी पुनर्वसन योजनेचे परिशिष्ट-२ विविध सक्षम प्राधिका-यांकडून पारित करण्यात येते. सदर परिशिष्ट-२ मधील अपात्र झोपडीधारकांना पात्रतेच्या अनुषंगाने अपिलीय प्राधिका-याकडे अपील दाखल करण्याबाबतची निश्चित कालमर्यादा नसल्याने योजनेच्या विविध टप्प्यात तसेच योजना पुर्ण झाल्यानंतर सुध्दा अपात्र झोपडीधारकांकडून अपीलीय प्राधिका-यांकडे अपील दाखल केले जातात. ज्यामुळे सदर झोपडीधारक पात्र झाल्यास त्यांचे पुनर्वसनाचा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे अपील दाखल करण्याबाबतची कालमर्यादा निश्चित करणे आवश्यक आहे. अपीलाच्या कालमर्यादेबाबत महाराष्ट्र झोपडपटटी सुधारणा निर्मुलण व पुनर्विकास ] अधिनियम १९७१ मध्ये तरतुद नसल्याने भारतीय Indian Limitction Act मधील तरतुदी लागू होतात. वरील सर्व बाबींचा विचार करुन खालील प्रमाणे निर्णय घेण्यात येत आहे.

१. योजनेचे आशयपत्र [Letter of Intent] निर्गमित केल्यानंतर संबंधित संस्था/विकासक/वास्तुविशारद यांनी योजनेचे आशयपत्र [LOI] व परिशिष्ट-२ प्रसिध्द करणेबाबत उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा कक्षाकडून रितसर परवानगी घ्यावी.

२. योजनेचे आशयपत्र, परिशिष्ट-२ विहित पध्दतीने प्रसिध्द केल्यानंतर प्रसिध्दीपासुन एक महिन्याच्या कालावधीत परिशिष्ट-२ मधील अपात्र झोपडीधारकांना त्यांचे पात्रतेबाबत अपिलीय प्राधिका-याकडे ९० दिवसांत अपील करणेबाबत विकासक यांनी कळवावे, व त्याबाबतचा अहवाल उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांचेकडे सादर करावा. त्यानंतर योजनेच्या पुढील टप्प्याच्या मंजुरीसाठी उपजिल्हाधिकारी, झोपुप्रा यांनी नाहरकत प्रमाणपत्र निर्गमित करावे.

३. अपात्र झोपडीधारकांनी अपीलीय प्राधिका-याकडे अपील करण्याचा ९० दिवसाचा कालावधी त्यांना विकासकामार्फत सुचना मिळाल्याचे दिनांकापासुन ग्राहय धरण्यात येईल.

मुख्य कार्यकारी अधिकारी
झोपडपटटी पुनर्वसन प्राधिकरण